**वादींचा साक्षीदार क्र. ०१ शपथेवर कथन करतो:**

**उलट तपासणी**
( प्रतिवादींसाठी वकील श्री. आर. व्ही. मोटे )

**१०.** सर्व्हे क्र. ५४ मौजे कन्हेरी हा माझ्या नावे आहे. मी त्याचा ७/१२ उतारा दाखल करण्यास तयार आहे. माझी पत्नी पाचवी पर्यंत शिकलेली होती. मी तिच्या शिक्षणाचा पुरावा देणार आहे. माझे शिक्षण झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कुटुंबाचा कर्ता मीच आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आमच्या शेतीची वहिती करुन स्वत:च उत्पन्न काढीत आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, पत्नी आणि मुलांना मीच सांभाळीत आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे कुटुंब माझ्यावरच अवलंबून आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे कुटुंब पत्नीवर अवलंबून नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पत्नीला वैयक्तिक उत्पन्नाचा कोणताही मार्ग नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या घरी सिलाई मशीन नव्हती. मी तशी सिलाई मशीन होती, हे दाखविण्यासाठी कागदोपत्री पुरावा देवू शकतो. मी पत्नी सिलाई मशीन काम करीत होती, हे दर्शविणारे कागदपत्र देवू शकतो. माझ्या पत्नीने सिलाई मशीनचे काम भाच्चीकडे शिकली होती. माझ्या भाच्चीकडे सिलाई मशीन प्रशिक्षण वर्ग नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, मी दाव्यामध्ये प्रतिवादींचे पद हे चुकीचे दर्शविलेले आहेत. विवादीत विजेचा खांब हा सामाईक बांधावर आहे. तो तेथे मागील दहा वर्षापासून आहे. सदर खांबाचे स्टे वायर हे आमच्याकडील बाजूच्या शेतीत होते. हे म्हणणे खरे नाही

की, सदरचे स्टे वायर तेथे मागील दहा वर्षापासून जसेच्या तसे आहे. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, ते तुटलेले आहे. सदरचे वायर वरच्या बाजुकडून जोडाला तुटलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर वायरला दोन्ही बाजूला इन्शुलेशन जोडलेले होते व आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर स्टे वायरला दोन्ही बाजूने इन्शुलेशन असल्याने त्यातुन खालच्या बाजूला विद्‌युत प्रवाह येत नाही.

**१२.** मला याची माहिती नाही की, घटना घडल्यानंतर प्रतिवादींचे अधिकारी त्या ठिकाणी पाहणीसाठी येवून गेले होते आणि त्यांनी तेथे पंचनामा करुन कागदपत्र तयार केले होते आणि त्याचा अहवाल त्यांच्या वरिष्ठांना पाठविला होता. हे म्हणणे खरे नाही की, अशा पंचनामा आणि अहवालाबाबत मला माहिती असूनही मी त्यांना आव्हान दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे कडबा कुटीची मशीन आहे आणि ती मशीन चालविण्यासाठी आम्ही बेकायदेशीररित्या विजेच्या तारेवर आकडा टाकून वीज जोडणी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने त्या वीज जोडणी घेतलेल्या तारेला हात लावला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मध्ये आणि पत्नीमध्ये नेहमी भांडणे व्हायची आणि त्या दिवशी देखील भांडणे झाली होती आणि त्याकारणाने तिने माझ्यावरील रागापोटी त्या तारेला धरले आणि त्यामूळे अपघात झाला. घटना घडल्याची तारीख मला आता आठवत नाही. घटनेचा वेळ हा सायंकाळी ४.३० ते ४.४५ वाजताचा होता. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावाला २४ तास वीज पुरवठा चालू नसतो. मी

हे सांगू शकत नाही की, घटनेच्या दिवशी आमच्या गावाला विजेचा पुरवठा कोणत्या वेळेमध्ये होता.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पत्नीच्या आकस्मिक मृत्युची नोंद पोलीस स्टेशनमध्ये झाली. हे म्हणणे खरे आहे की, वीज मंडळाच्या अधिका—यांनी घटना स्थळावर येवून फोटो काढले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या फोटोमध्ये देखील खांब आणि त्याचे स्टे वायर व्यवस्थित असल्याचे दिसुन आले होते. हे म्हणणे खरे आहे की, वाशी पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी माझा, मुलगा प्रमोद, सुधीर रसाळ, तारामती रसाळ, काशीनाथ रसाळ आणि नितीन मांडवे ईत्यांदीचे जवाब नोंदविले होते. हे म्हणणे खरे नाही की, यापैकी काही जणांनी पोलीसांना माझ्या पत्नीने स्वत: तारेला हात लावला असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, विद्युत निरिक्षक जाधव यांनी सदर अपघाताबाबत सखोल चौकशी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे आणि तत्कालीन लाईनमेन लहु आबा मासाळचे कोणतेही विवाद नाही.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्यापुर्वी मला याची माहिती होती की, विद्युत अपघाताबाबत वीज वितरण कंपनीकडुन नुकसान भरपाई मिळते. मी पत्नीचे मासिक उत्पन्न दाखविलेले आहे, त्याबाबत कागदोपत्री पुरावा देवू शकतो. मी पत्नीच्या जन्म तारखेचे कागदपत्र दाखल करु शकणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझया पत्नीचा आकस्मिक मृत्यु हा

प्रतिवादींच्या कोणत्याही निष्काळजीपणाने झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सांगतो आहे की, त्यावेळी स्टे वायरमध्ये विद्‌युत प्रवाह आला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी मी तेथे हजर नव्हतो आणि त्याबाबत मला वैयक्तिक माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी दाव्याबाबतची संपुर्ण माहिती ऐकीव आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीचे दररोजचे कोणतेही उत्पन्न नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी हुशार आणि मेहनती नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी तिचे दरमहा उत्पन्न हे काल्पनिक दर्शविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, नुकसान भरपाई मिळते याची माहिती असल्याने मी त्याचा गैरफायदा घेवून सदरचा खोटा दावा दिलेला आहे. मला लिहीता वाचता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर खोटा आहे.

**फेर तपासणी** — निरंक.

दिनांक: १५.०७.२०२५

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरित/—

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.